# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०२/०३/२०२५ (रविवार) संध्याकाळ**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक ०२/०३/२०२५ रोजी अरोली पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की नाल्याचे पात्रात ट्रॅक्टर द्वारे अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खिडकी शिवारातील नाल्याच्या पात्रात जात असातांना नाल्याकडुन रोड कडे एक विना क्रमांचा आयसर कंपनीचा ट्रॅक्टर मॉडेल क्र ४८० युएसजे आणि त्याला जोडलेली निळया रंगाची ट्रॉली दिसले.वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **दिनेश अंकुश मते , वय ३२ वर्षे, पत्ता. काटी, ता. मोहाडी जि. भंडारा** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **तसेच सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली**. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** १ ब्रास रेती आणि **२)** एक विना क्रमांचा आयसर कंपनीचा ट्रॅक्टर मॉडेल क्र ४८० युएसजे आणि त्याला जोडलेली निळया रंगाची ट्रॉली **असा एकुण ५,०५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

ट्रॅक्टर चालक /मालक आरोपी नामे **दिनेश अंकुश मते , वय ३२ वर्षे, पत्ता. काटी, ता. मोहाडी जि. भंडारा याच्या** विरूध्द पोस्टे अरोली येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. सहकलम ५०/१७७ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर